# डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)

२८, क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

Website: https://barti.maharashtra.gov.in

## अर्ज मागविण्यात येत आहेत (CALL FOR APPLICATION)

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत पाली त्रिपिटकाचे मराठीत भाषांतर करणेच्या महत्वाकांक्षी उपक्रमाकरीता तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा पाली त्रिपिटकाचे मराठीत भाषांतर हा उपक्रम संपेपर्यंत यापैकी जे आधी घडेल, तोपर्यंत विहीत अटी व शर्तीवर खालीलप्रमाणे मानधन तत्वावर करार पद्धतीने 'मनुष्यबळ नियुक्त करावयाचे असून'त्यासाठी पात्र उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर पदांना गुणवत्तेच्या व प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार नियुक्ती/ मुदतवाढ देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना पाली त्रिपिटकाचे मराठीत भाषांतर करणेच्या कामी पाली विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे पूर्ण वेळ नियुक्त करण्यात येणार आहे. उमेदवार निवडीचे व पदसंख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अंतिम सर्व अधिकार महासंचालक, बार्टी, पुणे यांना राहतील.

| अ.क्र. | मनुष्यबळ | आवश्यक व्यक्ती संख्या | आवश्यक शैक्षणिक अर्हता | एकत्रित मासिक मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | सहसंपादक | ०४ (चार) | एम. ए. (पाली / संस्कृत (पाली विषयासह) / बौद्ध अध्ययन), पीएच.डी. (पाली / संस्कृत (बौद्ध साहित्याशी संबंधित) / बौद्ध अध्ययन), बौद्ध धम्माची चांगली जाण, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचे उत्तम ज्ञान व संगणकाचे ज्ञान आवश्यक. संपादकीय आणि भाषांतराच्या कामकाजाचा अनुभव असणारांना प्राधान्य देणेत येईल. (विशेष क्षमता असणाऱ्या तसेच भाषांतराच्या क्षेत्रात प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्या विद्वानांच्या बाबतीत सदर अटी शिथिलक्षम असतील. सदर पदांकरिता वयाची कोणतीही अट नाही.) | रु. ३३३५०/- |
| २ | भाषांतरकार | १२ (बारा) | एम. ए. (पाली / संस्कृत (पाली विषयासह) / बौद्ध अध्ययन)उत्तीर्ण, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांचे उत्तम ज्ञान व संगणकाचे ज्ञान आवश्यक. भाषांतराच्या कामकाजाचा अनुभव असणारांना प्राधान्य देणेत येईल. | रु. २४९००/- |
| ३ | संशोधन अधिकारी | ०१ (एक) | पाली/संस्कृत/बौद्ध अध्ययन/प्राचीन भारतीय इतिहास/संस्कृती या विषयातील पदवीपरीक्षा उत्तीर्ण, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान, संगणकाचे ज्ञान आवश्यक. स्वीय सहाय्यकाच्या तसेच भाषांतराच्या कामाचा अनुभव असणारांना प्राधान्य देण्यात येईल. | रु. २४९००/- |
| ४ | सामान्य प्रशासक | ०१ (एक) | पाली/संस्कृत/बौद्ध अध्ययन/प्राचीन भारतीय इतिहास/संस्कृती या विषयातील पदवीपरीक्षा उत्तीर्ण, मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान व संगणकाचे ज्ञान आवश्यक. प्रशासकीय कामाचा अनुभव असणारांना प्राधान्य देण्यात येईल. | रु. २४९००/- |
| ५ | सहाय्यक ग्रंथपाल | ०१ (एक) | ग्रंथालय शास्त्रातील पदवी उत्तीर्ण व संगणकाचे ज्ञान आवश्यक. मराठी, हिंदी व इंग्रजी या भाषांचे उत्तम ज्ञान असणे आवश्यक, ग्रंथालय व्यवस्थापनाचा अनुभव व पाली, संस्कृत व बौद्ध अध्ययनाची चांगली जाण असणारांना प्राधान्य देण्यात येईल. | रु. १९९००/- |
| ६ | कार्यालयीन सहाय्यक | ०१ (एक) | किमान १२ वी उत्तीर्ण. | रु. ११४३८/- |

अर्जादारांकरिता अर्जाचा नमूना, बार्टीच्या **https://barti.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर "Notice Board" या लिंकवर **"Pali Tripitaka Translation Project 2019"** वर उपलब्ध आहे. इच्छुक उमेदवारांनी महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), २८ क्विन्स गार्डन, जुन्या सर्किट हाऊस जवळ, पुणे- ४११ ००१ या पत्त्यावर टपालाद्वारे अथवा हस्त पोहच किंवा bartipublication15@gmail.com या ईमेल आयडी वर अर्ज पाठवावेत. अर्जावर पाली त्रिपिटकाचे मराठीत भाषांतर प्रकल्पाचे पदांकरीता अर्ज असा उल्लेख करावा. अर्ज बार्टी, पुणे कार्यालयात टपालाद्वारे पोहचण्याची अथवा हस्त पोहच सादर करण्याची **अंतिम तारीख ५ ऑक्टोबर, २०१९** राहील.

**कैलास कणसे (भापोसे)**
**महासंचालक**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व**
**प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे**

**Advt/Pali/14/09/2019/26**